स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधन आराखडा

"बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बँक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास."

(विशेष संदर्भ परभणी जिल्हा)

मानवविज्ञान शाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी
सादर करण्यात येणा-या शोध प्रबंधाचा आराखडा.

संशोधक

कु. पुजा ज्ञानोबा शेळके

सामाजिक शास्त्रे विद्यासंकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

बी.रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,परभणी.

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

"बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बँक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास."
(विशेष संदर्भ परभणी जिल्हा)

प्रस्तावना :

बँकिंग क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेला आर्थिक स्थैर्य प्रदान करते. पैशाचा प्रवाह सुलभ करून तसेच आर्थिक क्रियाकलाप सक्षम करून अर्थव्यवस्थेत बँकिंग क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, कोणत्याही देशाच्या आर्थिक वाढ आणि विकासामध्ये बँकिंग क्षेत्र खूप महत्त्वाचे असते. बँकिंग क्षेत्र हे संपूर्ण आर्थिक क्षेत्राचा अविभाज्य भाग असतो. बँका गुंतवणूक पतपुरवठा आणि पायाभूत सेवा पुरवून देशाच्या अर्थव्यवस्थेवर चांगला परिणाम घडवून आणू शकतात. विकसनशील देशांमधील गरीब शेतकऱ्यांना जास्तीत जास्त कर्ज पुरवठा करून शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणू शकतात, त्याचबरोबर नवीन उद्योजकांना कर्ज पुरवठा देऊन विकसनशील देशातील उद्योग वाढीला चालना द्यायला मदत करतात. एकंदरीत कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये बँकांची भूमिका ही महत्त्वपूर्ण असते. ग्राहकांना पैसे ठेवण्यासाठी बँका सुरक्षित आणि सोयीस्कर व्यासपीठ प्रदान करतात. बँका ठेवीदार आणि कर्जदार यांच्यातील मध्यस्थ म्हणून देखील काम करतात.

प्रस्तुत संशोधनातून परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासामध्ये असणारी बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांची भूमिका अभ्यासली जाईल.

भारतामध्ये बँकांच्या स्थापनेपूर्वी बँकिंग क्रिया सावकारांसारख्या असंघटित क्षेत्राद्वारे केल्या जायच्या, त्यामध्ये सावकार सर्वसामान्य लोकांवर जास्तीत जास्त व्याज आकारायचे व त्यांचे आर्थिक शोषण करायचे. या समस्येवर मात करण्यासाठी संघटित बँकिंग क्षेत्राची स्थापना करण्यात आली.

भारतामध्ये सर्वप्रथम ब्रिटिशांनी आधुनिक बँकांचा पाया रोवला. 1770 मध्ये स्थापन झालेली बँक ऑफ हिंदुस्थान ही भारतातील पहिली बँक. या बँकेत युरोपियन गुंतवणूकदार हे भागभांडवलदार होते. 1832 मध्ये मात्र ही बँक बंद पडली. 1806 मध्ये स्वतः ईस्ट इंडिया कंपनीने बँक ऑफ कलकत्ता ही बंगाल प्रांतासाठी ची पहिली प्रांतीय बँक स्थापन केली. या बँकेचे नाव 1809 मध्ये बँक ऑफ बेंगाल असे करण्यात आले. 15 एप्रिल 1840 ला बँक ऑफ बॉम्बे आणि 1 जुलै 1843 ला बँक ऑफ मद्रास या दोन प्रांतीय बँका स्थापन झाल्या होत्या.

27 जानेवारी 1921 ला या तिन्ही बँकांच्या एकत्रीकरणातून एकच 'इंम्पेरियल बँक' नावाची बँक अस्तित्वात आली. 1954 मध्ये ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या 'अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षण समितीने' इम्पेरियल बँक भारत शासनाकडे हस्तांतरित करून तिचे नाव 'स्टेट बँक ऑफ इंडिया' करण्याची शिफारस केली. या समितीने राष्ट्रीयकरणाचा उद्देश बँक सेवा ही ग्रामीण व निमशहरी भागापर्यंत पोहोचावी हा असावा हे स्पष्ट केले, त्यामुळे भारत सरकारने

8 मे 1955 ला 'स्टेट बँक ऑफ इंडिया कायदा 1955' संमत केला. सध्या भारतातील आर्थिक व्यवहारामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारी बँक म्हणून स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेकडे पाहिले जाते.

बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेची स्थापना 16 सप्टेंबर 1935 रोजी झाली या बँकेचा दृष्टिकोन ग्राहकाभिमुख नाविन्यपूर्ण आणि तंत्रस्नेही असा आहे सध्या भारतात बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेच्या 1600 हून अधिक शाखा कार्यरत आहेत. या बँकेचे मुख्यतः लक्ष स्थानिक ग्राहकांना सेवा देण्याकडे असते. स्टेट बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ महाराष्ट्र दोन्ही बँका राष्ट्रीयीकृत बँका असून भारताच्या आर्थिक विकासामध्ये दोन्ही बँकेचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.

प्रस्तुत अभ्यास विषय "बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बँक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास" यामध्ये ग्राहकांना बँकांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध बँकिंग सेवांचा अभ्यास करण्यात येईल, त्याचबरोबर त्यांच्या वापरण्यात येणाऱ्या बँकिंग सेवावर ग्राहकांच्या प्रतिक्रिया नोंदवून बँकांना त्यांच्या सेवांची गुणवत्ता सुधारण्यासाठी शिफारस करण्यात येईल. बँक ऑफ महाराष्ट्र स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांनी ग्राहकांना पुरविलेल्या विविध सेवांचा तुलनात्मक अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येईल. त्याचबरोबर त्यांचे वित्तीय धोरण, कर्ज वितरण, नफा व आर्थिक घटकांचा सखोल अभ्यास करण्यात येईल.

बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांनी परभणी जिल्ह्यामधील ग्राहकांना पुरवलेल्या पी.पी.एफ. (सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी) विमा, लॉकर्स, बचत योजना, विविध खाते, मुदत ठेव, रियल टाईम ग्रॉस सेटलमेंट (RTGS), डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, डिमॅट खाते, ए.टी.एम., इंटरनेट बँकिंग, इक्विटी ट्रेडिंग सेवा, एल.सी., बी.जी. (लेटर ऑफ क्रेडिट अँड बँक हमी) इत्यादी सेवांचा अभ्यास करण्यात येईल. त्याचबरोबर बँकांच्या वित्तीय स्थितीचा देखील आढावा घेण्यात येईल.

प्रस्तुत संशोधनातून बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांनी ग्राहकांना दिलेली कर्ज, त्यांच्या ठेवी, बँकेचे व्याजदर यांचा अभ्यास करण्यात येईल तसेच परभणी जिल्ह्यातील आर्थिक व सामाजिक विकासात या बँकांच्या आर्थिक व्यवहारामुळे कशाप्रकारे मदत होते, त्याचा अभ्यास केला जाईल.

संशोधनाची आवश्यकता :

भारतीय अर्थव्यवस्थेतील तृतीय क्षेत्रातील सर्वात सक्रिय क्षेत्र म्हणून बँकिंग क्षेत्राकडे पाहिले जाते. बँका लघुउद्योग, कृषी, व्यापार, उद्योग इत्यादी क्षेत्रांना त्यांची वाढ करण्यासाठी निधी उपलब्ध करून देतात, त्यामुळे जिल्ह्याचा झपाट्याने विकास होत असतो. आर्थिक दृष्टिकोनातून महाराष्ट्र राज्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणून परभणी जिल्ह्याकडे पाहिले जाते. येथील बँकिंग प्रणाली जिल्ह्याच्या प्रगतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या दोन प्रमुख सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या सेवा परभणीच्या आर्थिक वाढीला गती देत आहेत. या बँकांची कार्ये त्यांचे वित्तीय धोरण व त्यांनी राबवलेल्या अनेक आर्थिक घटकांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे. या दोन्ही बँकांमध्ये ग्राहक सेवा, कर्ज, वितरण,नफा आणि विविध वित्तीय सेवा यामध्ये भिन्नता दिसून येते. प्रस्तुत संशोधनात बँक ऑफ महाराष्ट्र स्टेट बँक ऑफ इंडिया च्या सेवांचा तुलनात्मक अभ्यास करून परभणी जिल्ह्यातील आर्थिक प्रणाली व बँकिंग क्षेत्राच्या विकासाचा समग्र आढावा घेण्यात येईल.

संशोधनाचे महत्त्व :

स्टेट बँक ऑफ इंडिया व बँक ऑफ महाराष्ट्र या दोन्ही राष्ट्रीयकृत बँका असून परभणी जिल्ह्यामध्ये या बँकांच्या अनेक शाखा कार्यरत आहेत. स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेची विविध उत्पादने जसे की बचत खाते, चालू खाते, कर्ज, मुदतीचे ठेवी इत्यादींनी जिल्ह्यात महत्त्वपूर्ण ग्राहक वर्ग तयार केला आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया बँक परभणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर कृषी, व्यावसायिक आणि व्यक्तिगत कर्ज वितरण करते, त्याच बरोबर बँक ऑफ महाराष्ट्र सुद्धा परभणी जिल्ह्यामध्ये अनेक शाखाद्वारे विविध सेवा पुरवते. बँक ऑफ महाराष्ट्र स्थानिक शेतकऱ्यांना कृषी कर्ज, महिला उद्योजकांना आणि व्यावसायिकांना कर्ज पुरवठा करते. प्रस्तुत संशोधनात बँक ऑफ महाराष्ट्र स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कर्ज वितरण प्रणालीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येईल त्याचबरोबर त्यांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यात येईल.

संशोधन पद्धती :

“बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बँक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास” या संशोधनासाठी सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतीनुसार सर्वेक्षणात्मक तसेच विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

तथ्य संकलन :

बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया च्या बँक स्थितीच्या तुलनात्मक अभ्यास या संशोधन कार्याच्या अचूक तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोतांचा अवलंब करण्यात येईल, त्यामध्ये प्रश्नावली, मुलाखत या साधनांचा वापर केला जाईल.

दुय्यम स्त्रोत- प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक सामग्री बरोबरच दुय्यम सामग्रीचा वापर करून माहितीचे संकलन केले जाईल, त्यामध्ये राज्य सरकारने प्रकाशित केलेले अहवाल, बँकांनी प्रकाशित केलेली कागदपत्रे, दैनिके, मासिके कार्यालयीन अहवाल, इंटरनेटवरील माहिती इ. साधनांचा वापर केला जाईल या माहितीच्या सादरीकरणासाठी आवश्यक त्या ठिकाणी टक्केवारी, स्तंभालेख, सरासरी, केंद्रीय प्रवृत्तीचे परिमाणे इत्यादी सांख्यिकीय साधनाचा वापर केला जाईल.

संशोधनाची उदिष्टे :

1) बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँका परभणी जिल्हयामध्ये पूरवित असलेल्या विविध सेवांचा अभ्यास करणे.
2) परभणी जिल्हयातील बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडियाच्या आर्थिक व्यवहारांची तुलना करणे.
3) बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी परभणी जिल्हयामध्ये पुरविलेल्या बँकिंग सेवांचा ग्राहकांवर झालेला प्रभाव अभ्यासणे.
4) बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांना झालेल्या नफ्याचा तुलनात्मक अभ्यास करणे.
5) बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांनी विविध सेवा ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.
6) बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांच्या सेवांमुळे परभणी जिल्हयाच्या आर्थिक विकासामध्ये झालेला बदल अभ्यासणे.

गृहीतके :

1) परभणी जिल्हयाच्या विकासासाठी बँकिंग प्रणाली महत्वाची भूमिका बजावत आहे.
2) बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांच्या ग्राहकांना पुरविल्या जाणाऱ्या वित्तीय सेवांमध्ये भिन्नता आहे.
3) बँक ऑफ महाराष्ट्राचे परभणी जिल्हयातील कर्ज वितरण स्टेट बँक ऑफ इंडिया च्या तुलनेत कमी आहे.
4) परभणी जिल्हयातील बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांच्या ग्राहकांच्या संख्येमध्ये भिन्नता आहे.
5) परभणी जिल्हयातील बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या कर्ज वितरण प्रणालीमध्ये भिन्नता आहे.
6) बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांच्या नफ्यामध्ये फरक आहे.

नमुना निवड पद्धती :

"बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बँक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास" यामध्ये परभणी जिल्हयातील बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडियाच्या संभाव्यता नमुना निवड पद्धती वापरून तालुकानिहाय शाखांची निवड केली जाईल. परभणी जिल्हयामध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया च्या एकूण 33 शाखा आहेत, तर बँक ऑफ महाराष्ट्राच्या 6 शाखा आहेत. प्रस्तुत संशोधनातून बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या काही शाखा घेऊन त्यावर तुलनात्मक अध्ययन केले जाईल.

संशोधनाच्या मर्यादा :

बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बँक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास फक्त परभणी जिल्ह्यासंदर्भात करण्यात येणार आहे. या संशोधनात परभणी जिल्ह्यामध्ये बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँका ग्राहकांना पूरवित असणाऱ्या सेवांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येईल. सदर संशोधनाचा कालावधी हा सन 2013- 14 ते सन 2023- 24 असा राहील. सदर संशोधनाद्वारे काढण्यात येणारे निष्कर्ष केवळ परभणी जिल्ह्याच्या संदर्भात असतील, त्यामुळे त्याचा उपयोग इतर जिल्ह्यांना होईलच असे सांगता येणार नाही, म्हणून ही या संशोधनाची मर्यादा आहे.

प्रकरण रूपरेषा :

प्रकरण पहिले- प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाची पार्श्वभूमी, इतिहास,संशोधनाचा उद्देश, संशोधनाची आवश्यकता, महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची पद्धती, संशोधनाची गृहीतके, कालावधी, मर्यादा बँकांच्या शाखांची निवड इत्यादीचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण दुसरे: संशोधन साहित्याचा आढावा

या प्रकरणात संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येईल तसेच प्रस्तुत अभ्यास क्षेत्राविषयीची माहिती मिळवण्यात येईल व त्याचा पद्धतशीर अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण तिसरे: परभणी जिल्ह्याची पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणांमध्ये परभणी जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक पार्श्वभूमीचा सविस्तर आढावा घेण्यात येईल, त्याचबरोबर परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासामध्ये बँकिंग प्रणालीची भूमिका अभ्यासली जाईल.

प्रकरण चार: बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांनी पुरवलेल्या बँकिंग सेवांचे स्वरूप

प्रस्तुत प्रकरणात बँक ऑफ महाराष्ट्र स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांनी ग्राहकांना पुरविलेल्या विविध सेवांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येईल. त्याचबरोबर या बँकांनी पुरविलेल्या सेवांवर ग्राहकांच्या प्रतिक्रियांचा अभ्यास केला जाईल. प्रस्तुत प्रकरणात नोटबंदीचा बँक ऑफ महाराष्ट्र स्टेट बँक ऑफ इंडियाच्या आर्थिक व्यवहारावर झालेला परिणाम अभ्यासला जाईल. त्याचबरोबर कोविड-19 मध्ये ग्राहकांकडून बँक सेवा वापरावर झालेल्या बदलावर प्रकाश टाकला जाईल.

प्रकरण पाचवे: बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांची वित्तीय स्थितीचे तुलनात्मक अध्ययन

या प्रकरणांमध्ये बँक ऑफ महाराष्ट्र आणि स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या बँकिंग सेवा, नफा , कर्ज वितरण भिन्नता यांचा तुलनात्मक अभ्यास केला जाईल.

प्रकरण सहावे: निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणांमध्ये बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या दोन्ही बँकांच्या कार्यप्रणालीवर सविस्तर अभ्यास करून योग्य ते निष्कर्ष काढण्यात येतील. परभणी जिल्ह्यामध्ये या दोन बँकांचे महत्त्व लक्षात घेता, बँकांच्या सेवांची गुणवत्ता वाढविण्यासाठी, तसेच जिल्ह्याचा आर्थिक विकास वेगाने होण्यासाठी शिफारसी सुचविण्यात येतील.

संदर्भ ग्रंथ सूची :

परिशिष्टे :

संदर्भ ग्रंथ :

1) Alimon George, G.S. Gireesh Kumar, Internet Banking, New Age International Pvt. Ltd

2) Abha Singh (2011): e-Banking. Abd publisher's

3) Joshi, A., Bhaskar, P., & Gupta, P. K. (2020). Indian Economy Amid Covid-19 Lockdown: A Prespective. Journal Of Pure And Applied Microbiology. Pp. 957-961

4) Justin Paul. "Global trends in Banking sector: Analysis of high-tech services and remote channels". The Indian Banker, Vol.1, No.5, May 2006: pp. 10-15.

5) Ramani D. "Innovative Internet banking- Emerging issues and challenges". E- Business, Vol. VIII, Issue 2, February 2007: pp.29-35.

6) Ranjanakumar. "Restructuring of banks: An overview". Bank Quest, Vol. 74. No.4, Oct.-Dec.2003: pp.20-24.

7) कुलकर्णी व ढमढेरे (2007), अर्थशास्त्रीय संशोधन पदधती, डायमंड प्रकाशन पुणे.

8) डॉ किरण जी. देसले (2024); अर्थशास्त्र-1 दीपस्तंभ प्रकाशन, अहमदनगर.

9) रंजन कोळंबे (2021) भारतीय अर्थव्यवस्था, भागीरथ आय ए एस अकॅडमी पुणे.

10) डॉ. प्रदीप आगलावे 2008; सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

11)https://bankofmaharashtra.in

12)https://www.onlinesbi.sbi

13)https://mahaconnect.in

संशोधक
कु. पुजा ज्ञानोबा शेळके

मार्गदर्शक
प्रा. डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी.